## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP)

- राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस शुध्द आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वत:चा सर्वसमावेशक असा "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणार असून, सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता राज्य शासनामार्फ़त खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

| अ. क्र. | कार्यक्रमाचे उप घटक/वर्गीकरण | २०१६-१७ (रु. कोटी) | २०१७-१८ (रु. कोटी) | २०१८-१९ (रु. कोटी) | २०१९-२० (रु. कोटी) | एकुण (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | MRDWP अंतर्गत घ्यावयाच्या नवीन योजना | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | २०००.०० |
| २. | बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन | १३०.८६ | --- | --- | --- | १३०.८६ |
| ३. | प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | ४००.०० |
| **एकुण** | | **७३०.८६** | **६००.००** | **६००.००** | **६००.००** | **२५३०.८६** |

- सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रु.३६०.०० कोटी व सन २०१७-१८ आर्थिक वर्षात रु.२४०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच चालू आर्थिक वर्षाकरिता (सन २०१८-१९) रु.३३५.०० कोटी इतक्या निधीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

## १) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना :-

- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एकुण १००३ नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येणार असून त्यापैकी ९७२ योजना स्वतंत्र स्वरुपाच्या व २९ योजना प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. याकरिता चार वर्षाच्या कालावधीत रु.२००० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनांचा लाभ २०४६ गावे/वाड्यां-वस्त्यामधील ४७.५८ लक्ष नागरिकांना होणार आहे. सदर १००३ योजनांपैकी ४६ योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त व ९५७ योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फ़त करण्यात येणार आहे.

- नव्याने घ्यावयाच्या १००३ योजनांपैकी ११८ योजना (किंमत रु.२६०.०३ कोटी) या अन्य कार्यक्रमांतर्गत घेण्यात आल्या असल्याने किंवा आवश्यकता नसल्याने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून वगळण्याचा व २६ योजना (रु.२४५.२१ कोटी) नव्याने समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सदर कार्यक्रमांतर्गत ९११ पाणीपुरवठा योजना नव्याने राबविण्यात येत आहेत.

- सद्य:स्थितीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाच्या ९११ पाणीपुरवठा योजनांपैकी रु.१५७९.३१ कोटी इतक्या किंमतीच्या ७७५ नळ पाणी पुरवठा योजनांना (मजीप्रा-३८ व जिल्हा परिषद-७३७) मंजुरी देण्यात आली आहे. सदर योजनांच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६-१७ व २०१७-१८ आर्थिक वर्षात अंदाजे रु.४८३.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

- मंजूरी देण्यात आलेल्या ७६५ पाणीपुरवठा योजनांपैकी ४५६ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच १७६ योजनांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत व उर्वरित १४३ योजनांच्या निविदा प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

## २) बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन

- अन्य कार्यक्रमातर्गत राबविण्यात आलेल्या परंतु सद्य:स्थितीत बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवित करण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता रु.१३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनांचा लाभ २१.५५ लक्ष नागरिकांना होणार आहे.

- सद्य:स्थितीत बंद असलेल्या ८३ योजनांपैकी रु.२४.७३ कोटी इतक्या किंमतीच्या १८ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मंजूरी देण्यात आलेल्या सर्व योजनांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

- उर्वरित बंद असलेल्या ६५ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना खालील कारणामुळे पुनरुज्जिवित करता येऊ शकल्या नाहीत.

- प्रादेशिक योजनेत समाविष्ट गावांच्या ग्रामसभाचे किमान ७० टक्के पाणीपट्टी वसूली करण्याबाबत ठराव प्राप्त झाले नाहीत.
- प्रादेशिक योजनेत समाविष्ट काही गावांकरिता स्वतंत्र योजना राबविण्यात आल्या असल्याने उर्वरित गावांकरिता योजना पुनरुज्जिवित करणे भौतिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होत नाही.
- काही योजनांचे उद्भव शाश्वत नाहीत त्यामुळे योजना पुनरुज्जीवित केली तरी वापरात आणणे शक्य नाही.

**३) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती :-**

- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीत प्रत्येक वर्षी रु.१०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- विभागाच्या दि.१९.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर निधी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना प्रोत्साहनपर अनुदानाच्या स्वरुपात (पाणीपट्टी आकारणी व वसूलीच्या प्रमाणात) वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

- सन २०१६-१७ आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या रु.५५.०० कोटीपैकी रु.१६८.०० लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. उर्वरित निधी मागणी नसल्याने शासनास समर्पित करण्यात आला. तसेच सन २०१७-१८ आर्थिक वर्षाकरिता रु.१२.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

*****